# दिबांच्या नावाच्या शैक्षणिक संकुलाचे स्वप्न साकार होणार

## उरण मधील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नामकरण फलकाचे उदघाटन

**उरण , दि. २ (वार्ताहर) :** दिबांच्या नावाने सुरू करण्यात येणाऱ्या नाम फलक आणि संरक्षण भिंतीच्या कामाचे उदघाटन विजया दशमीच्या दिवशी करण्यात आलं. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर,कॉ. भूषण पाटील,काशिनाथ गायकवाड,सुधाकर पाटील,जगदीश उरणकर,संतोष पवार आणि या संकुलाचे काम हाती घेणारे विजय शिरढोणकर,राजेंद्र शिरढोणकर तसेच संस्थेच अध्यक्ष दिनेश घरत आदीजण उपस्थित होते. २००८ पासून प्रस्तावित असलेल्या या दिबांच्या नावाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची उभारणी होत आहे. उरण मध्ये निर्माण होणाऱ्या पहिल्या वहिल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाला तब्बल १४ वर्षांनी सुरुवात होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. याची सुरुवात विजयादशमीच्या दिवशी होणार आहे.




त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिबांच्या हयातीत आयुष्यात प्रथमच एखाद्या संस्थेला नाव देण्यास मंजुरी त्यांनी दिली होती. ते उरणमध्ये दिबांच्या नावाने उभरण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या १४ वर्षांपासून राखलेले आहे. याकडे विविध पक्षांच्या नेत्यांचेही सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. रायगड जिल्ह्यातील खेड्यापाड्यात विशेषतः उरण, पनवेल तालुक्यातील

माजी खासदार दि. बा. पाटील यांनी उभारलेल्या विद्यालयातून अनेक पिढया शिक्षण घेऊ शकल्या आहेत. मात्र दिबांच्या हयातीत त्यांच्या नावाने उरण मध्ये उभारण्यात येणार अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या १४ वर्षात स्वप्नातच राहिले आहे. दुसरीकडे उठसूट दिबांच्या नावाने मतांचा जोगवा मागणाऱ्या विविध पक्षांच्या नेत्यांचेही दुर्लक्ष सुरू आहे. २००८ मध्ये उरणच्या सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत सामाजिक ,शैक्षणिक कार्य करण्याच्या उद्देशाने उरण प्रकल्पग्रस्त सामाजिक शैक्षणिक संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून हे अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यात येणार आहे.


उरण मध्ये देशातील सर्वात जास्त व मोठं मोठे केंद्र व राज्य उद्योग असलेले ठिकाण आहे. तर नवी मुंबईच्या विकासाचा भाग असूनही गेल्या ५२ वर्षात एकही उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय उभे राहू शकले नाही. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी मुंबई, नवी मुंबई किंवा पनवेल गाठावे लागत आहे. आजची हीच स्थिती आहे. त्यामुळे या प्रकल्पग्रस्त संस्थेच्या माध्यमातून अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याचा संकल्प करण्यात आला. या महाविद्यालयाला माजी खासदार दिबां पाटील यांचं नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मात्र दिबांनी आपल्या हयातीत आशा प्रकारे महाविद्यालयाला आपलं नाव देण्यास विरोध केला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आजचे पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालय हे महाविद्यालय उभारण्यात त्यांचा सिहाचा वाटा होता. त्यामुळेच उरण, पनवेल,बेलापूर आणि कर्जत येथील विद्यार्थी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करू शकले. मात्र दिबांनी या महाविद्यालयाला महात्मा फुले यांचे नाव दिले. अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी उरण मधील सर्वपक्षीय नेत्यांच्या मनधरणी नंतर त्यांनी उरणच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाला नाव देण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी उरणच्या उरण पनवेल महामार्गा लगत सिडकोकडून भूखंड ही मिळविण्यात यश आले.

मात्र गेल्या अनेक वर्षांपासून हे अभियांत्रिकी महाविद्यालय रखडले आहे. यासाठी उरण- पनवेल मधील सर्वसामान्य जनता आणि स्थानिक उद्योजकांनी आर्थिक सहकार्य केले. परंतु येथील अनेक बड्या उद्योगानी निधी देण्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. काही महिन्यांपूर्वी जेएनपीएने निधी देऊ केला आहे. मात्र त्यातून महाविद्यालय उभारणे अशक्य आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या दिबांच्या नावाच्या रखडलेल्या महाविद्यालयाची दखल राजकीय नेते दखल घेतील अशी अपेक्षा होती. मात्र तीही फोल ठरली आहे. यामुळे स्थानिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनाची लगबग; रस्त्यांचे डांबरीकरण, दुभाजकांचे रंगकाम

**नवी मुंबई, दि. २ (वार्ताहर) :** देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन ८ ऑक्टोबरला सायंकाळच्या सुमारास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यासाठी केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री तसेच राज्यातील अनेक मंत्री उपस्थित राहणार असून कार्यक्रमासाठी भव्य तयारी सुरू आहे.



सिडको महामंडळाने उद्घाटनापूर्वी शहराचे सौंदर्य आणि सोयीसुविधा वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील खड्डे बुजवून डांबरीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून पुढील सहा दिवसांत ही कामे पूर्ण करण्याचे आदेश उच्च स्तरावरून देण्यात आले आहेत. तसेच दुभाजक स्वच्छ करून रंगकाम, हिरवळीसाठी रोप लागवड आणि अनधिकृत ढाबे-हॉटेल्स हटवण्याची मोहीम राबवली जात आहे. उद्घाटनस्थळी सुमारे पाच हजार लोकांसाठी भव्य मंडप उभारला जात असून महायुतीच्या विविध पक्षांचे कार्यकर्ते या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. पार्किंग, येण्या-जाण्याची व्यवस्था आणि पाहुण्यांसाठी सुविधा याबाबत सिडको आणि स्थानिक प्रशासन बैठकांद्वारे नियोजन करत आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबई पोलीस दलासह सिडकोचा दक्षता विभाग, वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभाग संयुक्तरित्या कार्यरत आहेत. याशिवाय विमानतळ प्रकल्पात योगदान देणाऱ्या माजी सनदी अधिकाऱ्यांनाही या समारंभात विशेष सन्मान देण्यात येणार आहे.

## शहरात २२ ठिकाणी 'पे अँड पार्क' योजना

**नवी मुंबई, दि. २ (वार्ताहर) :**नवी मुंबई हे नियोजित शहर असले तरी लोकसंख्या वाढीने अपेक्षेपेक्षा अधिक वाहने झाल्याने शहरात पार्किंग समस्येने बिकट रूप धारण केले आहे. त्यावर उतारा म्हणून नवी मुंबई महापालिकेने २२ ठिकाणी 'पे अँड पार्क' योजना आखली असून यामुळे ३ हजारपेक्षा अधिक वाहनांना पार्किंगसाठी जागा मिळणार आहे. निदान या ठिकाणी तरी बेशिस्त पार्किंगला आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नवी मुंबई शहरात आठही नोडमध्ये कमी-अधिक प्रमाणात गाड्या पार्किंगची समस्याच आहे. त्यात ऐरोली सीबीडी आणि कोपरखैरणे या ठिकाणी सर्वाधिक पार्किंग समस्या आहे. वाशीत खास पार्किंगसाठी बहुमजली इमारत आणि नाल्यावर स्लॅब टाकून सोय करण्यात आली आहे. सध्या आखलेल्या 'पे अँड पार्क' योजनेनुसार सीबीडी आणि ऐरोली दरम्यान २२ ठिकाणी पार्किंग जागांचे व्यवस्थापन आणि संचालन करण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. यात १,३६८ दुचाकी आणि २,७६८ चारचाकी वाहनांसाठी पार्किंगची सोय होणार असल्याचा दावा केला जात आहे. वाहनांची वाढती सख्या आणि जागेच्या कमतरतेमुळे वाहनचालक रस्त्याच्या दोन्ही बाजूला जागा मिळेल तिथे त्यांची वाहने पार्क करतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी वाढते. ही समस्या अंतर्गत रस्ते मोठे असूनही उग्र बनत चालली आहे. अनेकदा वाहने केवळ रस्त्यांवरच नव्हे तर उद्यान आणि खेळाच्या मैदानांमध्येही पार्क केली जातात.

## ऑक्टोबरच्या सुरुवातीला धरणे काठोकाठ; वर्षभराची चिंता मिटली,ऑक्टोबरमधला पाऊस बोनस ठरणार



**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) :** गेल्या आठवड्यात कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणारी सातही धरणे काठोकाठ भरली असून मुंबईकरांची वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली आहे. दरवर्षी १ ऑक्टोबरला धरणातील पाणीसाठ्याचा आढावा घेऊन वर्षभराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जाते. त्यानुसार यंदा तरी मुंबईकरांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार नाही. ऑक्टोबर महिन्यातही पावसाची शक्यता असून हा पाऊस म्हणजे मुंबईकरांसाठी पाणीपुरवठ्याचा बोनसच ठरणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी अशा सातही धरणांत २ ऑक्टोबर रोजी ९८.८२ टक्के पाणीसाठा आहे. या धरणातून मुंबईला दर दिवशी ४००० दशलक्ष लीटर पाण्याचा पुरवठा केला जातो. पावसाळ्याचे चार महिने पूर्ण झाले की ऑक्टोबर महिन्यात पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पाणी पुरवठ्याचे नियोजन केले जाते. यंदा ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला धरणे काठोकाठ भरली असल्यामुळे पाणीपुरवठ्याची चिंता मिटल्याची माहिती पालिकेच्या जल अभियंता विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबईला पाणीपुरवठ्यासाठी सध्या सात धरणांतील पाणीसाठ्यावर भिस्त आहे. सगळी धरणे कठोकाठ भरली तरी गेली सलग तीन वर्षे मुंबईकरांवर पावसाळ्याच्या आधी पाणी कपात लागू करण्याची किंवा राखीव साठा वापरावा लागला. मात्र गेल्या काही वर्षांपासून ऑक्टोबर महिन्यातही पाऊस पडत असल्यामुळे त्याचा मुंबईकरांना चांगलाच फायदा होतो आहे. धरणातील एकूण साठ्यापैकी सुमारे ११ ते १२ टक्के पाणी एका महिन्याला लागते. ऑक्टोबरमध्ये पाऊस सुरू राहिल्यास सुमारे २० दिवसांचा पाणीसाठा किंवा पाच ते सात टक्के पाणीसाठा अधिकचा मिळतो. त्यामुळे उन्हाळ्यातही धरणात पाणीसाठा शिल्लक राहतो. तसेच राखीव साठा वापरण्याची वेळ येत नाही. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये पाऊस पडल्यास तो मुंबईकरांसाठी मोठा दिलासाच असतो, असे मत मुख्य जलअभियंता पुरुषोत्तम माळवदे यांनी व्यक्त केले आहे.

गेल्यावर्षी पाऊस ऑक्टोबर महिन्यापर्यंत सुरू होता. तरीही सावधगिरीचा उपाय म्हणून मुंबई महापालिकेने उन्हाळ्यात राखीव साठ्याचा वापर करण्यासाठी राज्य सरकारची मंजुरी घेतली होती. भातसामधून १ लाख ११ हजार दशलक्ष लीटर आणि उर्ध्व वैतरणा धरणातून ६७ हजार दशलक्ष लीटर राखीव पाणीसाठा मंजूर करून घेतला होता. पण यंदा पाऊस लवकर सुरू झाल्यामुळे उर्ध्व वैतरणा धरणातून केवळ २००० दशलक्ष लीटर साठा वापरला. तर भातसा धरणातील पाणीसाठा वापरण्याची वेळच आली नाही, अशी माहिती माळवदे यांनी दिली.


UGRO CAPITAL

# यूग्रो कॅपिटल लिमिटेड

४ था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई ४०० ०७०

**मागणी सूचना**

**सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (कायदा) व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या तरतूदी अंतर्गत.**

**यूग्रो कॅपिटल लिमिटेडचे** अधिकृत अधिकारी म्हणून आणि अधिनियमाच्या कलम १३(२) आणि नियम ३ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिनियमाच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केल्या आहेत, ज्यामध्ये खालील कर्जदारांना सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित सूचनांमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे. अधिनियमाअंतर्गत स्वाक्षरी करणाऱ्यांना वाजवीपणे असे वाटते की, कर्जदार मागणी सूचनांची सेवा टाळत आहेत, म्हणून नियमांनुसार मागणी सूचनांची सेवा चिकटवून आणि प्रकाशन करून केली जात आहे. मागणी सूचनेतील मजकूर खाली दिला आहे :

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | मागणी सूचना तारीख आणि रक्कम |
|---|---|---|
| १. | १) व्रज कार अॅक्सेसरीज २) ज्योत्स्ना जयेंद्रभाई शाह जयेंद्रभाई शहा ३) नीरव जयेंद्रकुमार शहा ४. बिन्नी निरव शाह<br>एलएएन : एचसीएफएमएचओएसईसी००००१००८०९२ | मागणी सूचना तारीख : १० सप्टेंबर २०२५<br>सूचना रक्कम : रु. ६७५९०१७/– तारीख ०८.०९.२०२५ |

**सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :–** फ्लॅट क्रमांक १०२, बी विंग, स्टाय लक्ष्मी अपार्टमेंट, एम. जी. क्रॉस रोड क्रमांक ४, पटेल नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई – ४०००६७, आणि नकाशावर काळ्या रंगात कोणत्या जमिनी रेखाटल्या आहेत आणि परिशिष्ट–१ मध्ये जोडल्या आहेत आणि कोणत्या जमिनी खालीलप्रमाणे सीमाबद्ध आहेत : **पूर्व :** ए विंग, **पश्चिम :** अंतर्गत रस्ता **उत्तर :** वसंत लक्ष्मी **दक्षिण:** लक्ष्मी टॉवरसह सर्व केसमेंटरी हक्क आणि सांगितलेल्या जमिनींशी संबंधित इतर हक्क आणि हितसंबंध.

कर्जदारांना याद्वारे मागणी सूचनांचे पालन करण्यास आणि त्यामध्ये आणि येथे नमूद केलेली मागणी रक्कम या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत लागू व्याज, विलंबाने पैसे भरण्याचा दंड, बाउन्स शुल्क, खर्च आणि खर्च इत्यादींसह देयक वसूल होईपर्यंत भरण्याची सूचना देण्यात येत आहे. कर्जदारांनी हे लक्षात ठेवावे की **यूजीआरओ कॅपिटल लिमिटेड** एक सुरक्षित कर्जदार आहे आणि कर्जदाराने घेतलेली कर्ज सुविधा ही **यूग्रो कॅपिटल लिमिटेडकडे** कर्जदाराने गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेविरुद्ध एक सुरक्षित कर्ज आहे.

जर कर्जदाराने निर्धारित वेळेत त्यांचे दायित्व पूर्ण केले नाही तर, यूग्रो कॅपिटल लिमिटेड कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याचे सर्व अधिकार वापरण्यास पात्र असेल, ज्यामध्ये विक्रीद्वारे किंवा कर्जदाराच्या कर्ज खात्यातील थकबाकी वसूल करण्यासाठी कायदा आणि त्याखालील नियमांनुसार उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांचा समावेश आहे परंतु इतकेच मर्यादित नाही. **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** विक्री किंवा हस्तांतरणाचा अधिकार लागू करण्यापूर्वी सुरक्षित मालमत्तेला जोडण्याचा आणि/किंवा सील करण्याचा अधिकार आहे. सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीनंतर, **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** कर्जदाराने **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** देय असलेल्या थकबाकी भरण्यासाठी जर सुरक्षित मालमत्तेचे मूल्य अपुरे असेल तर, उर्वरित थकबाकी वसूल करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार आहे. हा उपाय यूग्रो कॅपिटल लिमिटेडला इतर कोणत्याही कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेल्या इतर सर्व उपायांपेक्षा अतिरिक्त आणि स्वतंत्र आहे. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३(८) कडे आकर्षित केले आहे, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात आणि कायद्याच्या कलम १३(१३) कडे देखील आकर्षित केले आहे, ज्याद्वारे कर्जदाराला सुरक्षित मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे (सामान्य व्यवसायाव्यतिरिक्त) कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंधित/प्रतिबंधित केले आहे. वरील नियमांचे पालन न करणे हा कायद्याच्या कलम २९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची प्रत खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडे उपलब्ध आहे आणि कर्जदार, जर त्यांना हवे असेल तर, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून ते गोळा करू शकतात.

ठिकाण : मुंबई
तारीख : ०३.१०.२०२५
सही/– (प्राधिकृत अधिकारी)
यूग्रो कॅपिटल लिमिटेडसाठी authorised.officer@ugrocapital.com



ACRE MAKING ASSETS WORK

# अॅसेट्स केअर अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्रायजेस लि.

सीआयएन : U65993DL2002PLC115769
नोंदणीकृत कार्यालय : १४ वा मजला, इरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली – ११० ०१९.
दूरध्वनी : ९१–११–४३११५६०० फॅक्स : ९१–११–४३११५६१८
कॉर्पोरेट कार्यालय : युनिट क्रमांक ५०२, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट क्रमांक सी–६६, जी–ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई – ४०००५१.
दूरध्वनी : ०२२ ६८६४३१०१ ई–मेल : acre.arc@acreindia.in वेबसाइट : www.acreindia.in

**परिशिष्ट ४–ए स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) च्या तरतूद सहवाचन.

सर्वसाधारणपणे आणि विशेषतः कर्जदार, सह–कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या **अॅसेट्स केअर अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लिमिटेड (सीआयएन : U65993DL2002PLC115769) (सुरक्षित कर्जदार)** यांच्याकडे गहाणखत/चार्ज केल्या आहेत, ज्याचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित कर्जदाराच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्या **जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर** विकल्या जातील जेणेकरून सुरक्षित कर्जदाराला देय असलेली रक्कम खालील कर्जदार, सह–कर्जदार, गहाणखतदार आणि जामीनदारांकडून प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केलेली राखीव किंमत आणि इसारा रक्कम वसूल केली जाईल :

**सुरक्षित मालमत्तेची माहिती**

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. व एसीआरई ट्रस्ट नाव | कर्जदार/सह–कर्जदार/ गहाणवटदार/हमीदार यांचे नाव | दि. ३० सप्टेंबर, २०२५ अनुसार एकूण थकित रक्कम | राखीव मूल्य | इसारा रक्कम ठेव | इरठे प्रदानाकरिता बँक खाते तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७७६३७००००७४०, ००१बीएम०६२०१०७०००२, ००१पीसीएफसी१९०८४०००७, ००१पीसीएफसी१९०९५०००९, १९६एलए१७१८१५९०००२, ००१बीएम०६२०१०६०००२, १९६एलए१७१८१५९०००१, ७७८४६०००१९४० आणि ७७८४६०००२०३१ एसीआरई–१६६–ट्रस्ट | ग्लोबल इम्पोर्ट एक्सपोर्टस त्यांचे प्रोप्रायटर माणिक चावला, दिप्ती चावला | रु. ९,८२,८७,०९३/– (रु. नउ करोड ब्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार त्र्याणव फक्त) ७७६३७००००७४०, ००१बीएम०६२०१०७०००२, ००१पीसीएफसी१९०८४०००७, ००१पीसीएफसी१९०९५०००९, १९६एलए१७१८१५९०००२, ००१बीएम०६२०१०६०००२, १९एलए६१७१८१५९०००१, ७७८४६०००१९४० आणि ७७८४६०००२०३१ | रु. २,८०,००,०००/– (रु. दोन करोड ऐंशी लाख मात्र) | रु. २८,००,०००/– (रु. अठ्ठावीस लाख मात्र) | खाते नाव : एसीआरई – १६६– ट्रस्ट खाते क्र. : ०९०११०२००००४२११२ बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी कोड : आयबीकेएल००००९०१ |

**प्रतिभूत मालमत्तेचे विवरण :** फ्लॅट क्र. ६०४ सहावा मजला लिलियम को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, सेक्टर क्र. आर–१२, नाहर अमृत शक्ती चांदिवली अंधेरी (ई) मुंबई दोन कार पार्किंग जागेसह – ४०००७२.

वरील कर्ज खाते सर्व हक्क, मालकी, व्याज, अंतर्निहित सुरक्षा, तारण आणि/किंवा हमी, स्थावर मालमत्तांसह, येथे नमूद केलेले, अॅसेट्स केअर अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्रायजेस लिमिटेडला देण्यात आले होते, जे वर दिलेल्या कॉलममध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करतात.

| लिलाव प्रक्रियेबाबत महत्त्वाची माहिती | | |
|---|---|---|
| १. | डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटी द्वारे ईएमडी पेमेंट वर नमूद केलेल्या बँक खात्यांच्या नावे काढले/भरले जाईल. | |
| २. | लिलावाची तारीख आणि वेळ | २७ ऑक्टोबर २०२५, दुपारी २:३० ते ३:३० |
| ३. | ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख | २४ ऑक्टोबर २०२५ दुपारी ४:०० वाजेपूर्वी |
| ५. | लिलावाचे ठिकाण (लिलावासाठी वेबसाइट) | www.auctionfocus.in |
| ६. | संपर्क तपशील | श्री. रोहन सावंत – ९८३३१४३०१३<br>श्री. हरी नायर – ९८४६०९८०९८ |
| ७. | मालमत्तेची तपासणी फक्त पूर्व नियुक्तीच्या आधारावर आहे. | |
| ८. | विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया www.acreindia.in.in/ www.auctionfocus.in या वेबसाइटला भेट द्या. | |

तारीख : ०३.१०.२०२५
ठिकाण : मुंबई
सही/–
प्राधिकृत अधिकारी
अॅसेट्स केअर अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्रायजेस लि.



**THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY AND IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT AND DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES. NOT FOR RELEASE, PUBLICATION OR DISTRIBUTION DIRECTLY OR INDIRECTLY OUTSIDE INDIA.**

(Please scan this QR Code to view the DRHP)

PUBLIC ANNOUNCEMENT

HIGHNESS One of a kind

# HIGHNESS MICROELECTRONICS LIMITED

*(Formerly known as Highness Microelectronics Private Limited)*
**Corporate Identification Number: U72900MH2007PLC173854**

Our Company was originally incorporated as a Private limited company under the Companies Act, 1956 in the name and style of "Highness Microelectronics Private Limited" bearing Corporate Identification Number U72900MH2007PTC173854 dated September 6, 2007 issued by the Registrar of Companies, Mumbai. Subsequently, our Company was converted into a Public Limited Company vide Special Resolution passed by the Shareholders at the Extra Ordinary General Meeting, held on August 31, 2024 and consequently the name of our Company was changed from "Highness Microelectronics Private Limited" to "Highness Microelectronics Limited " vide a fresh certificate of incorporation dated November 11, 2024 issued by the Registrar of Companies, Mumbai bearing CIN U72900MH2007PLC173854. At present, the registered office of the company situated at Office 1C3, 1st Floor, Gundecha Onclave, Kherani Road, Saki Vihar, Andheri (East), Mumbai- 400072, Maharashtra. For further details, please refer to section titled "Our History and Certain Other Corporate Matters" beginning on page No.161 of this Draft Red Herring Prospectus.

**Registered Office:** Office 1C3, 1st Floor, Gundecha Onclave, Kherani Road, Saki Vihar, Andheri (East), Mumbai- 400072, Maharashtra
**Contact Person:** Ms. Preeti Paresh Rathi **Email Id:** investor@highnessmicro.com
**Tel No:** +91- 022-28507123**; Website:** www.highnessmicro.com
**Promoters of our Company:** Mr. Gaurav Manjul Kejriwal, Mr. Manjul Kumar Kejriwal and Mrs. Shruti Gaurav Kejriwal

**"THE OFFER IS BEING MADE IN ACCORDANCE WITH CHAPTER IX OF THE SEBI ICDR REGULATIONS (IPO OF SMALL AND MEDIUM ENTERPRISES) AND THE EQUITY SHARES ARE PROPOSED TO BE LISTED ON SME PLATFORM OF BSE LIMITED."**

**THE OFFER**

**INITIAL PUBLIC OFFER OF UPTO 18,06,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10/- EACH OF HIGHNESS MICROELECTRONICS LIMITED ( THE "COMPANY" OR THE "OFFEROR") FOR CASH AT A PRICE OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE INCLUDING A SHARE PREMIUM OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE (THE "OFFER PRICE") AGGREGATING TO ₹ [●] THOUSAND ("THE OFFER") COMPRISING OF A FRESH ISSUE UPTO 16,53,600 EQUITY SHARES AGGREGATING TO ₹ [●]/- THOUSAND (THE "FRESH ISSUE") AND AN OFFER FOR SALE OF UPTO 38,400 EQUITY SHARES BY PROMOTER SELLING SHAREHOLDER- MR. GAURAV MANJUL KEJRIWAL AND MR. MANJUL KUMAR KEJRIWAL, AGGREGATING TO ₹ [●]/- THOUSAND ("OFFER FOR SALE"), OF WHICH [●] EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10/- EACH FOR CASH AT A PRICE OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE INCLUDING A SHARE PREMIUM OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE AGGREGATING TO ₹ [●] THOUSAND WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY MARKET MAKER TO THE OFFER (THE "MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE OFFER LESS THE MARKET MAKER RESERVATION PORTION i.e. NET OFFER OF [●] EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10/- EACH AT A PRICE OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE INCLUDING A SHARE PREMIUM OF ₹ [●]/- PER EQUITY SHARE AGGREGATING TO ₹ [●] THOUSAND IS HEREIN AFTER REFERRED TO AS THE "NET OFFER". THE OFFER AND THE NET OFFER WILL CONSTITUTE [●] % AND [●] %, RESPECTIVELY, OF THE POST OFFER PAID UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY. THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES IS ₹ 10/- EACH.**

**THE PRICE BAND AND THE MINIMUM BID LOT WILL BE DECIDED BY OUR COMPANY IN CONSULTATION WITH THE BRLMS AND WILL BE ADVERTISED IN [●] EDITION OF [●] (A WIDELY CIRCULATED ENGLISH NATIONAL DAILY NEWSPAPER) AND [●] EDITION OF [●] (A WIDELY CIRCULATED HINDI NATIONAL DAILY NEWSPAPER, AND [●] EDITION OF [●], A MARATHI REGIONAL NEWSPAPER (MARATHI BEING THE REGIONAL LANGUAGE OF MUMBAI WHERE OUR REGISTERED OFFICE IS LOCATED), AT LEAST TWO WORKING DAYS PRIOR TO THE BID/OFFER OPENING DATE AND SHALL BE MADE AVAILABLE TO THE SME PLATFORM OF BSE LIMITED ("BSE SME") FOR THE PURPOSES OF UPLOADING ON THEIR WEBSITE.**

In case of any revision in the Price Band, the Bid/Offer Period shall be extended for at least three additional Working Days after such revision of the Price Band, subject to the total Bid/Offer Period not exceeding ten Working Days. In cases of force majeure, banking strike or similar unforeseen circumstances, our Company, for reasons to be recorded in writing, extends the Bid/Offer Period for a minimum of one working day, subject to the Bid/Offer Period not exceeding ten working days. Any revision in the Price Band, and the revised Bid/Offer Period, if applicable, shall be widely disseminated by notification to the Stock Exchanges by issuing a press release and also by indicating the change on the website of the BRLM and at the terminals of the Members of the Syndicate and by intimation to Designated Intermediaries and Sponsor Bank.

This Offer is being made through the Book Building Process, in terms of Rule 19(2)(b) of the Securities Contracts (Regulation) Rules, 1957, as amended ("SCRR") read with Regulation 229 of the SEBI ICDR Regulations and in compliance with Regulation 253 of the SEBI ICDR Regulations wherein not more than 50.00% of the Net Offer shall be available for allocation on a proportionate basis to Qualified Institutional Buyers ("QIBs") (the "QIB Portion"), provided that our Company in consultation with the BRLM may allocate up to 60.00% of the QIB Portion to Anchor Investors on a discretionary basis in accordance with the SEBI ICDR Regulations ("Anchor Investor Portion"), of which one-third shall be reserved for domestic Mutual Funds, subject to valid Bids being received from domestic Mutual Funds at or above the Anchor Investor Allocation Price. In the event of under-subscription or non-allocation in the Anchor Investor Portion, the balance Equity Shares shall be added to the Net QIB Portion (other than the Anchor Investor Portion) ("Net QIB Portion"). Further, 5.00% of the Net QIB Portion shall be available for allocation on a proportionate basis to Mutual Funds only, and the remainder of the Net QIB Portion shall be available for allocation on a proportionate basis to all QIB Bidders, including Mutual Funds, subject to valid Bids being received at or above the Offer Price. However, if the aggregate demand from Mutual Funds is less than 5.00% of the Net QIB Portion, the balance Equity Shares available for allocation in the Mutual Fund Portion will be added to the remaining Net QIB Portion for proportionate allocation to QIBs. Further, not less than 15.00% of the Net Offer shall be available for allocation on a proportionate basis to Non-Institutional Investors (where one third of the portion available to non-institutional investors shall be reserved for applicants with application size of more than two lots and up to such lots equivalent to not more than ₹ 10 lakhs and two third of the portion available to non-institutional investors shall be reserved for applicants with application size of more than ₹ 10 lakhs) and not less than 35.00% of the Net Offer shall be available for allocation to Individual Investors who applies for minimum application size in accordance with the SEBI ICDR Regulations, subject to valid Bids being received from them at or above the Offer Price. All potential Bidders (except Anchor Investors) are required to mandatorily utilise the Application Supported by Blocked Amount ("ASBA") process providing details of their respective ASBA accounts, and UPI ID in case of IBs using the UPI Mechanism, if applicable, in which the corresponding Bid Amounts will be blocked by the SCSBs or by the Sponsor Bank under the UPI Mechanism, as the case may be, to the extent of respective Bid Amounts. Anchor Investors are not permitted to participate in the Offer through the ASBA process. For details, see "Offer Procedure" beginning on page 256 of this Draft Red Herring Prospectus.

This public announcement is being made in compliance with the Regulation 247 of SEBI (ICDR) Regulations, 2018 and SEBI (ICDR) (Amendment) Regulations, 2025 vide notification dated March 03rd, 2025, and applicability of corporate governance provisions under SEBI (LODR) Regulations, 2015 on SME companies to inform the public that our Company is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt requisite approvals, market conditions and other considerations, to undertake initial public offering of its Equity Shares pursuant to the offer and DRHP dated September 30, 2025 which has been filed with the SME Platform of BSE Limited.

Pursuant to SEBI (ICDR) (Amendment) Regulations, 2025 on March 03rd, 2025 and applicability of corporate governance provisions under SEBI (LODR) Regulations, 2015 on SME companies, for fulfilling all additional eligibility criteria, the DRHP filed with the SME Platform of BSE Limited (BSE SME) shall be made available to the public for comments, if any, for a period of at least 21 days, from the date of such filing by hosting it on the website of the BSE at https://www.bsesme.com/PublicIssues/SMEIPODRHP.aspx and the website of the Company at www.highnessmicro.com and at the website of BRLM i.e. Fintellectual Corporate Advisors Private Limited at www.fintellectualadvisors.com. Our Company hereby invites the members of the public to give their comments on the DRHP filed with the SME Platform of BSE Limited (BSE SME) with respect to disclosures made in DRHP. The members of the public is requested to send a copy of their comments to Stock Exchange, to Company Secretary and Compliance Officer of our Company and/or the BRLM at their respective addresses mentioned below. All comments must be received by BSE, and/or our Company and/or Company Secretary and Compliance Officer of our Company and/or the BRLM in relation to the offer on or before 5 p.m. on the 21st day from the aforesaid date of filing the DRHP with BSE SME.

Investments in Equity and Equity related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in this offer unless they can afford to take the risk of losing their entire investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in the Offer. For taking an investment decision, investors must rely on their own examination of our Company and the Offer including the risks involved. The Equity Shares issued in the Offer have not been recommended or approved by the Securities and Exchange Board of India ("SEBI"), nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the Draft Red Herring Prospectus. Specific attention of the investors is invited to the section "Risk Factors" beginning on page 27 of this Draft Red Herring Prospectus.

Any decision to invest in the equity shares described in the Draft Red Herring Prospectus may only be taken after a Red Herring Prospectus has been filed with the ROC and must be made solely on the basis of such Red Herring Prospectus as there may be material changes in the Red Herring Prospectus from the Draft Red Herring Prospectus. The equity shares, when offered through the Red Herring Prospectus, are proposed to be listed on SME Platform of BSE LIMITED ("SME BSE").

For details of the share capital and capital structure of our Company and the names of the signatories to the Memorandum of Association and the number of shares subscribed by them of our Company, see "Capital Structure" beginning on page 70 of the Draft Red Herring Prospectus. The liability of the members of our Company is limited. For details of the main objects of our Company as contained in our Memorandum of Association, see "Our History and Certain Other Corporate Matters " beginning on page 161 of the Draft Red Herring Prospectus.

| BOOK RUNNING LEAD MANAGER | REGISTRAR TO THE OFFER | COMPANY SECRETARY AND COMPLIANCE OFFICER |
|---|---|---|
| FINTELLECTUAL CORPORATE ADVISORS | Skyline Financial Services Pvt. Ltd. Towards Excellence | **Ms. Preeti Paresh Rathi**<br>**Address:** Office 1C3, 1st Floor, Gundecha Onclave, Kherani Road, Saki Vihar, Andheri (East), Mumbai- 400072, Maharashtra<br>**Tel.:** +91 84540 40540<br>**E-mail:** cs@highnessmicro.com<br>**Website:** www.highnessmicro.com |
| **FINTELLECTUAL CORPORATE ADVISORS PRIVATE LIMITED**<br>**SEBI Registration No.:** INM000012944<br>**Address:** B-20, Second Floor, Sector- 1, Noida, Gautam Buddha Nagar, Uttar Pradesh- 201301<br>**Telephone No:** +91-120-4266080<br>**Website:** www.fintellectualadvisors.com<br>**Email ID:** ipo@fintellectualadvisors.com<br>**Contact Person:** Mr. Amit Puri/ Mr. Pramod Negi | **SKYLINE FINANCIAL SERVICES PRIVATE LIMITED**<br>**SEBI Registration No.:** INR000003241<br>**Address:** D-153A, First Floor, Okhla Industrial Area, Phase-I, New Delhi-110020<br>**Tel No.:** 011-40450193-197<br>**E-mail:** ipo@skylinerta.com<br>**Investor Greievance E-mail:** grievances@skylinerta.com<br>**Website:** https://www.skylinerta.com/ .<br>**Contact Person:** Mr. Anuj Rana<br>**CIN:** U74899DL1995PTC071324 | *Investors can contact our Company Secretary and Compliance Officer, the Lead Managers or the Registrar to the Offer, in case of any pre-offer or post-offer related problems, such as non-receipt of letters of allotment, non-credit of allotted Equity Shares in the respective beneficiary account, non-receipt of refund orders and non-receipt of funds by electronic mode etc.* |

All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the DRHP.

**For Highness Microelectronics Limited**
On Behalf of the Board of Directors
Sd/-
**Ms. Preeti Paresh Rathi**
**Company Secretary and Compliance Officer**

**Place: Mumbai, Maharashtra**
**Date: October 03, 2025**

Disclaimer: Highness Microelectronics Limited is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offer of its Equity Shares and has filed the Draft Red Herring Prospectus on September 30, 2025. The Draft Red Herring Prospectus is available on the website of BSE SME at https://www.bsesme.com/PublicIssues/SMEIPODRHP.aspx and is available on the websites of the BRLM at www.fintellectualadvisors.com and also on the website of the Company www.highnessmicro.com. Any potential investors should note that Investments in Equity and Equity related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in this offer unless they can afford to take the risk of losing their entire investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in the offer. For taking an investment decision, investors must rely on their own examination of our Company and the Offer including the risks involved. The Equity Shares issued in the Offer have not been recommended or approved by the Securities and Exchange Board of India ("SEBI"), nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the Draft Red Herring Prospectus. Specific attention of the investors is invited to the section "Risk Factors" beginning on page 27 of this Draft Red Herring Prospectus.

**The Equity Shares have not been and will not be registered under the U.S Securities Act of 1933, as amended (U.S. Securities Act) or any state securities laws in the United States and may not be offered or sold within the United States or to, or for the account or benefit of, U.S Persons (as defined in Regulation ), except pursuant to exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities laws. Accordingly, the Equity Shares are being offered and sold only outside the United States in offshore transaction in reliance on Regulation S under the U.S Securities Act and the applicable laws of the jurisdiction where those offers and sale occur. The Equity Shares have not been and will not be registered, listed or otherwise qualified in any other jurisdiction outside India and may not be offered or sold, and application may not be made by persons in any such jurisdiction, except in compliance with the applicable laws of such jurisdiction.**